" २ ऑक्टोबर " या गांधीजयंती दिनी
**आदर्श ग्रामसेवक पुरस्कार देणेबाबत**

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- ग्रासेपु-२०११ / प्र.क्र. १०८/ आस्था-९
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १९ एप्रिल, २०१२

वाचा :- १) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
क्रमांक :- वैप्रोब-१०९६/प्र.क्र. ३२०२ /४९ , दि. १० नोव्हेंबर, १९९८
२) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
क्रमांक:- मविसे-१०९९/प्र.क्र. ३०१९ /१०, दि. २ मे, २०००

**प्रस्तावना** :- अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हास्तरावरील आदर्श ग्रामसेवक पुरस्कार निवड समितीमध्ये सदस्य म्हणून घेण्याबाबत जिल्हा परिषदांकडून पाठपुरावा होत होता. तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषदेचे विविध विषय वाटप करण्यात आलेले असल्याने व आदर्श ग्रामसेवक पुरस्काराबाबतचे कामकाजही अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सोपविलेले असल्याने त्यांचा समावेश समितीत असल्यास कामकाजाचे मुल्यमापन करणे सुलभ व्हावे या दृष्टीकोनातून त्यांचा या समितीमध्ये समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत सर्वंकष विचाराअंती शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय** :- शासन निर्णय क्र.वैप्रोब-१०९६/प्र.क्र.३२०२ /४९, दिनांक १० नोव्हेंबर, १९९८ अन्वये आदर्श ग्रामसेवक निवडीसाठी जिल्हास्तरावर स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली असून या समितीमध्ये आता नव्याने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समावेश करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे सदरची कार्यकारिणी आता पुढील प्रमाणे राहील :-

| | |
|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत )जिल्हा परिषद | सदस्य सचिव |
| अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | सदस्य |
| प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य |
| ग्रामसेवक युनियन प्रतिनिधी | सदस्य |

सदरचा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२०४१९१०९५७३८४३८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( दत्तात्रय बो-हाडे )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मुख्यमंत्री महोदयांचे सचिव
२) सर्व मंत्री महोदयांचे खाजगी सचिव
३) सर्व राज्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव
४) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
५) मंत्रालयीन सर्व विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
६) सर्व विभागीय आयुक्त
७) सर्व जिल्हाधिकारी
८) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
९) सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
१०) महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई
११) महालेखापाल, महाराष्ट्र -२, नागपूर
१२) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३) अप्पर संचालक, प्रकल्प आखणी व एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, पे अॅन्ड अकॉउंट्स कॉम्प्लेक्स, बॅरंक नं १४, मुंबई.
१४) सर्व उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी , ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) निवड नस्ती आस्था-९